**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या शुक्रवार दिनांक ११.३.२०११ रोजी झालेल्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३७ वी बैठक दि.११.३.२०११ रोजी दुपारी ३.३० वाजता गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील गुलझारी लाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.सुभाष हजारे, भा.प्र.से. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी |
| २. | मा.श्री.ल.पुलकुंडवार | अवर सचिव,महाराष्ट्र शासन |
| ३. | मा. नंदकुमार काळे | सदस्य |
| ४. | मा.बशीर पटेल | सदस्य |
| ५. | मा.श्री.किसन बा.जाधव | सदस्य |
| ६. | मा.श्रीमती.सुरेखा पाटील | सदस्या |
| ७. | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ८. | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| ९. | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १०. | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| ११. | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२. | मा. तारीक फारुकी | सदस्य |
| १३. | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १४. | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता, | सचिव |
| १५. | उपकर निर्धारक व संकलक, (दुरुस्ती उपकर विभाग, महापालिका) | निमंत्रक |
| १६. | श्री.ओ.बी.साहू | सहमुख्य अधिकारी |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या १३७ व्या बैठकीत सर्व उपस्थित सन्मा.सदस्यांचे हार्दिक स्वागत करुन सर्व सन्मा.सदस्यांना विषयसूची पाठविली असल्याचे सांगितले व मा.सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

सचिव श्री.महिषी यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने मूळ विषय सूचीतील विषय चर्चेस घेण्यास सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती केली.

सचिव श्री.महिषी यांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दिनांक २२.२.२०११ रोजी झालेल्या १३६ व्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकीय बैठकीचा व सदर तहकूब झालेल्या व दिनांक २८.१.२०११ रोजी संपन्न झालेल्या १३६ व्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकीय बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत पृष्ठ क्र. १ ते ७ वर सादर करण्यांत आला आहे, असे सांगितले.

बाब क्रमांकः-१३७.१

**विषयः-१.** मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दिनांक २२.२.२०११ रोजी झालेल्या १३६ व्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकीय बैठकीचा व सदर तहकूब झालेल्या व दि.२८.१.२०११ रोजी संपन्न झालेल्या १३६ व्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकीय बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

२. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.२२.२.२०११ रोजीच्या १३६ व्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकाची तहकूब केलेली बैठक शुक्रवार दि.२८.२.२०११ रोजी घेण्यांत आलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृष्ठ क्र. ०१ ते ०७ वर सादर करण्यांत आले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पृष्ठ क्र. १० वर परिच्छेद क्र. २ मध्ये सन २०११-१२ चे वार्षिक अर्थसंकल्प रु.२८६कोटी २५लक्ष ऐवजी रु.२८३ कोटी २५लक्ष असे असावयास पाहिजे अशी सुधारणा सुचविली व तशी सुधारणा करुन घेण्यास सांगितले.

मा.मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी वरील सुधारणेस मान्यता देऊन कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी बी-विभागातील ना हरकत प्रमाणपत्र मिळालेल्या एका इमारतीतील ३५ लोकांनी आपले गाळे खाली केलेले नसून, त्यांना कलम ९५ (अ)लावण्याबाबतची नस्ती मुख्य अधिकारी/दुवपु यांचेकडे पाठविण्यांत आलेली आहे. परंतु यावर अजुनही निर्णय दिलेला नाही, असे प्रतिपादन केले.

यावर मा.मुख्य अधिकारी/दुवपु यांनी कार्यकारी अभियंता श्री.सिध्दीकी व निवासी कार्यकारी अभियंता यांचेकडे विचारणा केली असता, या सदंर्भात नस्ती अद्याप मंडळाकडे प्राप्त झाली नसल्याचे दिसून आले. तथापि यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, जर अशा कांही महत्वाच्या नस्तींवर तांतडीने निर्णय अपेक्षित असल्यास संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु मंडळ यांना त्याबाबत अवगत करावे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पृष्ठ क्र.४ वरील परिच्छेद ४ व ५ मध्ये मंगलवाडीचा प्रस्ताव आगामी बैठकीत सादर करण्यांत येईल, असे सांगण्यांत आले होते त्याचे काय झाले, अशी विचारणा केली.

यावर सचिव यांनी सदर प्रस्ताव आयत्या वेळच्या विषयामध्ये घेण्यांत आला आहे, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अभ्यास गटाने जेएनयुआरएम अंतर्गत इमारत दुरुस्तीच्या सादर केलेल्या अहवालासंदर्भात विचारणा केली व जर अहवाल बैठकीत चर्चेस आला असता, तर त्यावर चर्चा करुन तो मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचेकडे पाठविता आला असता, यावर सचिव श्री.महिषी यांनी अहवाल नुकताच प्राप्त झाला असून, त्यावर पुढील कार्यवाही लवकरच करण्यांत येईल, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी, मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे, पुनर्रचित इमारतीतील १८०/२२५ चौ.फुटाच्या गाळयांची यादी अजुनही मिळाली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली व यादी देण्याची व्यवस्था करावी, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी असे सांगितले की, मुंबई मंडळास वर्ग करावयाच्या १३१ गाळयांच्या यादीमधून फक्त १७ गाळे वर्ग केले गेले आहेत, असे दिसून येते. मग बाकीचे गाळे वर्ग का केले नाहीत, याबाबत विचारणा केली. अनिवासी गाळे विघ्नहर्ता सदन १०, त्यापैकी ३ गाळे वितरीत करण्यांत आले आहेत. सदर गाळे कोणाला वितरीत करण्यांत आले याबद्दलची माहिती नमूद केलेली नाही, सरोवर इमारत, भायखळा अनिवासी गाळा १ कोणाला वितरीत केला आहे, ते यादीत नमूद नाही, शितळा देवी येथील अनिवीास गाळा नं.७ कोणाला वितरीत केला आहे तो यादीत नमूद नाही. सदस्यांना यादी देताना ती परिपूर्ण व अद्ययावत असावी, असे मा.सदस्य श्री.शिरिषकर यांचे म्हणणे होते.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सर्व कार्यकारी अभियंतांकडून प्रत्येक इमारतीतील रिक्त गाळयांची यादी, त्यांची आजची स्थिती घेऊन ती यापुढे दरमहा संक्रमण शिबिरामध्ये किती रिक्त गाळे आहेत, पुनर्रचित इमारतीत किती रिक्त गाळे आहेत, याची माहिती मंडळाच्या वेबसाईटवर टाकण्यांत येणार आहे.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी वरील यादीतील १७ गाळयांपैकीही २ गाळयांचे वितरण झालेले आहे व फक्त १५च गाळे रिक्त आहेत, असे सांगितले.

मुख्य अधिकारी/दुवपु यांनी सांगितले की, सध्या मुंबई मंडळाकडे गाळे वर्ग करण्याचे थांबविले आहे, मास्टर लिस्टवरील व्यक्तींना गाळयाच्या वितरणाचे धोरण अंतिम केले, त्यास दि.१०.३.२०११ रोजी प्राधिकरणाने मान्यता दिली आहे, त्याप्रमाणे प्रथम मास्टर लिस्ट प्रसिध्द करुन व एकंदर सर्व उपलब्ध रिक्त गाळयांची यादी प्रसिध्द करुन रिक्त गाळेकरिता मास्टर लिस्टवरील व्यक्तींकडून अर्ज मागविण्यांत येऊन, व जर यांतील कांही गाळयांना मागणी आली नाही तर असे गाळे मुंबई मंडळाकडे वर्ग करण्यांत येणार आहेत. मात्र सन्माननीय सदस्य श्री.किसन जाधव यांनी वरील पध्दतीस विरोध दर्शविला. त्यांनी रिक्त गाळयांचे वितरण मंडळाच्या धोरणाप्रमाणे का करु नये, याबद्दल विचारणा केली. त्यास मा.मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांनी मंडळाच्या धोरणामध्ये प्राधिकरणाने बदल केला आहे, असा खुलासा केला, त्यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी येथे अशी विनंती केली की, पुन्हा प्राधिकरणाला विनंती करण्यांत यावी की, मंडळाचा जो हक्क आहे, तो दुस-यांना देऊ नये. आपल्या दुवपु मंडळाने जर गाळे बांधलेले आहेत, तर ते दुवपु मंडळानेच का वितरीत करु नयेत.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी कांही उदाहरणे देऊन, यशोमंदिर या इमारतीच्या १५ गाळयांमध्ये अनधिकृत व्यक्ती रहातात, असे सांगितले.

त्यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, यशोमंदिरच्या संदर्भात असलेले १५ गाळयां बाबत इमारत पुनर्रचित झाल्यावर आधी ताबा घेतलेले रहिवाशी आहेत, मंडळाने रितसर ताबा द्यायचा असतो

तो दिला नाही. त्यावर त्यांच्या नस्त्या उपमुख्य अधिकारी (पु.गा.)या कार्यालयात दाखल केल्या आहेत की नाहीं, याची खात्री कार्यकारी अभियंता यांनी करुन घ्यावी, अशा सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले की, क-हाडे इमारतीतील गाळयांचा ताबा देतांना खूप दिरंगाई झाली. कांही लोकांना ताबा दिला कांहीना ताबा न दिल्याने ते तसेच घुसले पण ते तेथील जुनेच रहिवाशी आहेत. त्यांना २०-२० वर्षे झालेली आहेत. त्यावर मुख्य अधिकारी/दुवपु यांनी कार्यकारी अभियंत्यांनी त्यांच्या नस्त्या दाखल करुन घेऊन त्यांना रितसर ताबा देण्याची कार्यवाही गुणवत्तेवर करावी, अशा सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री.शिरिषकर म्हणाले की, १८०/२२५ चौ.फुटाच्या गाळयांची यादी मा.सभापतींनी पुढच्या बैठकीत देऊ असे सांगितले होते , ती देखील यादी अद्यापपर्यंत मिळालेली नाही. आम्हाला देण्यांत आलेल्या यादया चुकीच्या आहेत, मंडळाने रिक्त व वितरीत केलेल्या गाळयांची पडताळणी करण्याबाबत विनंती केली.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी(पु.गा.) यांना सर्व कार्यकारी अभियंत्यांकडून एकदा रिक्त गाळयांची अंतिम यादी घेऊन उर्वरित गाळे कोणाला वितरीत केले, याची पूर्ण माहिती देण्याबाबत सांगितले, व मंडळाच्या प्रत्येक विभागाकडून माहिती देताना दिशाभूल होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी २००७ ते २०११ पर्यंत वितरीत केलेल्या गाळयांची सविस्तर माहिती देण्याबाबत विनंती केली आहे. या संदर्भात एक पत्रही मा.मुख्य अधिकारी यांना दिलेले आहे, असे सांगितले.

यावर पुढे चर्चा करताना मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी असे सुचविले की, जर ११७ रिक्त गाळयांच्या यादीमध्ये चुक वाटत असेल तर ३ सदस्यांची समिती करुन, त्या गाळयांची तपासणी करायला कार्यकारी अभियंत्यांसोबत पाठवावे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.मठपती,उपमुख्य अधिकारी/पु.गा.यांना सूचना केल्या की, त्यांनी सर्व सदस्यांना यादीबाबत त्यांचे जे मुद्दे आहेत, त्याचे निराकरण करण्याकरिता एक दिवस पूर्णवेळ त्यांना द्यावा, अशा सूचना दिल्या.

तसेच मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व कार्यकारी अभियंतांना सूचना केल्या की, त्यांनी रिक्त सर्व गाळयांची यादी १५ दिवसांत द्यावी, रिक्त गाळयांची यादी प्रसिध्द करावयाची आहे, त्यामुळे त्याची पुन्हा पडताळणी करावी. सर्व उपमुख्य अभियंत्यांनी सदर माहितीबद्दल खात्री करुन घ्यावी. याबाबत पुन्हा चूक होणार नाही, याची दक्षता सर्व अधिका-यांनी घ्यावी.

सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी फलकाबद्दल पुन्हा विचारणा केली व कुठल्याही प्रकारे कार्यवाही न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. बी-विभागात फलक लावलेले नाहीत. डी-विभागात फलक लावलेले आहेत, असे सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पृष्ठ क्र.७ वरील स्ट्रक्चरल ऑडिटचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी त्याबाबत म.न.पा.ला पत्र दिले आहे, असे सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनी बोटावाला चाळीतील रहिवाश्यांना मा.मुख्य अधिकारी यांचेशी चर्चा करावयाची आहे. ३० टक्के लोक विकासकाने बांधलेल्या इमारतीत रहावयास गेले आहेत, परंतु ७० टक्के लोकांचा विकासकाशी करारनामा न झाल्याने ते २२५ ऐवजी ३०० चौ.फुटाच्या गाळयांची मागणी करीत आहेत, यावर निर्णय अपेक्षित आहे, रहिवाशी नवीन इमारतीत स्थलांतरित झालेले नाहीत.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता,श्री.शेठ यांना याबाबत संबंधितांना सुनावणी देऊन, त्यांचे प्रश्न सोडवावेत, अशा सूचना दिल्या.

सन्मा.सदस्य श्री.शिरिषकर यांनीही गावदेवी येथील जे.के.इमारतीचा प्रश्न उपस्थित केला, यापैकी इ.क्र.८ अजुनही पाडलेली नाही, विकासकाकडून त्यांना आताच्या नियमाप्रमाणे ३०० चौ.फुटाची जागा हवी आहे.

यावर निवासी कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, बहुतांशी इमारती पाडून झालेल्या आहेत, एकच इमारत पाडलेली नाही, शापुरर्जी पालनजी हे विकासक आहेत. इमारत क्र.८ च्या लोकांचे असे म्हणणे आहे की, आमची इमारत जर पाडलेली नाही, तर आम्हाला ३०० चौ.फुटाचे गाळे नवीन इमारतीत नियमानुसार देय आहेत की नाही, ते तपासून निर्णय घेण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.सदस्या श्रीमती.उल्का पाटकर यांनी मागील बैठकीत विचारलेल्या प्रश्नावर निष्कासनाची काय कार्यवाही झाली याबाबत विचारणा केली. त्यावर कार्यकारी अभियंता श्री.तिवारी यांनी सदर प्रकरणी निष्कासन कार्यवाही करण्यांत आल्याचे सांगितले.

वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यांत आले.

**बाब क्रमांक : १३७.२(१)**

**विषयः-उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.**
परिमंडळ-१ मधील (अ, सी-२, सी-३) **०४** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१३ ते २१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

२००७ चा डी.एस.आर.आहे तो रिव्हाईज करणे आवश्यक आहे. डी.एस.आर.बदलावयाची कार्यवाही कोण करणार अशी विचारणा सभागृहात झाली. त्यावर सचिव श्री.महिषी यांनी सांगितले की, यापूर्वी उपमुख्य अभियंता(दक्षिण) हे डी.एस.आर.करायचे आता उपमुख्य अभियंता,परिमंडळ-१ व परिमंडळ-२ त्यांच्या संयुक्त कमिटीने डीएसआर बदलण्याची कार्यवाही करावी. २ टक्के बाब तेवढीच रेट ॲनालिसिस करायचे बाकीचे डी.एस.आर.प्रमाणे करायचे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११७७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **०४** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.८५,३२,१८७/- (रुपये पंच्याऐंशी लक्ष बत्तीस हजार एकशे सत्याऐंशी फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४४,१९,१५५/- (रुपये चव्वेचाळीस लक्ष एकोणीस हजार एकशे पस्तीस फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.२(२)**

**विषयः-उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.**
परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,डी-३) **१६** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.२३ ते ३१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११७८**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **१६** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,३०,६२,२२५/- (रुपये तीन कोटी तीस लक्ष बासष्ट हजार दोनशे पंचवीस फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,२०,९३,१२३/- (रुपये दोन कोटी वीस लक्ष त्र्याण्णव हजार एकशे तेवीस फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.२(३)**

**विषयः-उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.**
परिमंडळ-२ मधील (डी-२,डी-३,ग/दक्षिण ) **०९** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.३३ ते ४१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११७९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार एकूण ०९ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,३२,६२,३४५/- (रुपये

दोन कोटी बत्तीस लक्ष,बासष्ट हजार तिनशे पंचेचाळीस फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,२१,८९,७३८/- (रुपये एका कोटी एकवीस लक्ष एकूणनव्वद हजार सातशे अडतीस फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.२(४)**

**विषय:-उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.**
परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग/दक्षिण ) **२०** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.४३ ते ५३ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **२०** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,२८,९१,५९९/- (रुपये पाच कोटी अठ्ठावीस लक्ष,एक्याण्णव हजार पाचशे नव्व्याण्णव फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,०७,८०,३२७/- (रुपये तीन कोटी सात लक्ष ऐंशी हजार तिनशे सत्तावीस फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.२(५)**

**विषय:-उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.**
परिमंडळ-२ मधील (ग/उत्तर,फ/उत्तर,फ/दक्षिण ) **१३** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५५ ते ६५ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **१३**पकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी रु.४,२७,५३,५३२/- (रुपये चार कोटी सत्तावीस लक्ष,त्रेपन्न हजार पाचशे बत्तीस फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,२९,१२,००४/- (रुपये दोन कोटी एकोणतीस लक्ष बारा हजार चार फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.३(१)**

**विषय:**-उपमुख्य अभियंता-परिमंडळ-२ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याबाबत (डी-३).

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६७ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८२**

उपमुख्य अभियंता,परि-२ यांनी त्यांच्या अखत्यारितील कार्यकारी अभियंता,डी-३, यांच्या विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाकरिता सन २०११-२०१२ करिता रुपये ६,१७,३८६/- (रुपये सहा लक्ष,सतरा हजार तिनशे शहाऐंशी फक्त ) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.३(२)**

**विषय:**-उपमुख्य अभियंता-परिमंडळ-२ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याबाबत (डी-१).

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६९ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८३**

उपमुख्य अभियंता,परि-२ यांनी त्यांच्या अखत्यारितील कार्यकारी अभियंता,डी-१, यांच्या विभागातील उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाकरिता सन २०११-२०१२ करिता रुपये २,७६,४५२/- (रुपये दोन लक्ष शहाहत्तर हजार चारशे बावन्न फक्त ) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.४(१)**

**विषय:-परिमंडळ-**१,२ मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रकमेस मंजुरी मिळण्याबाबत.
इमारत क्र.१०२,भुलाभाई देसाई रोड, मुंबई.परिमंडळ-१

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८४**

इमारत क्र.१०२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई या इमारतीच्या तिस-या टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्तीच्या सुधारित नकाशे व अंदाजपत्रकास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवरील वाढीव रक्कम रुपये १,३२,६३६/- या रकमेस प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.४(२)**

**विषय:-परिमंडळ-**१,२ मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रकमेस मंजुरी मिळण्याबाबत.
इमारत क्र.५८-५८-अे,बी,सोनापूर लेन,परिमंडळ-१

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७३ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८५**

इमारत क्र.५८-५८ अे,बी,सोनापूर लेन,सी-३ विभाग या इमारतीच्या चौथ्या टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवरील वाढीव रक्कम रुपये २७,३७३/- या रकमेस प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

## <u>शुध्दीपत्रक</u>

**बाब क्रमांक : १३७.५(१)**

**विषय:-शुध्दीपत्रक:-इ.क्र.** ३७-४१ घोगारी मोहल्ला या इमारतीच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७७ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८६**

इमारत क्र.३७-घोगारी मोहल्ला या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास १३५ व्या बैठकीत दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करण्यांस व त्याप्रमाणे परिमंडळ-१ ची प्रशासकीय मान्यता रक्कम रु.३,०८,१६,७२७/- ऐवजी रु.२,९७,३२,५०९/- इतकी व टप्प्याची रक्कम रु.१,९३,४१,२१९/- ऐवजी १,८७,६२,२४९/- अशी करण्यास तसेच सी-१ विभागाची प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.१,६६,५९,७३९/-ऐवजी रु.१,५५,७५,५२१/- व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,०६,३६,७०४/- ऐवजी रु.१,००,५७,७३४/- इतकी करण्यास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.५(२)**

**विषय:-शुध्दीपत्रक:-इ.क्र.**७ फेअर ब्रीज (पार्वती निवास) या इमारतीच्या प्रशासकीय मान्यतेच्या दुरुस्तीच्या टप्प्यामध्ये झालेल्या बदलाबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७९ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११८७**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.१३.१.२०१० रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीत इमारत क्र.७ फेअर ब्रीज (पार्वती निवास ) या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे तिस-या टप्प्याऐवजी चौथा टप्पा करण्यास व प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.१२,८७,०८७/-निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६,५२,४३७/-(दुरुस्ती दर २०२८.०३) करण्यास सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक : १३७.६(१)**

**विषय:-**भूकर पहाणी क्र.२३२४ (भाग) व २३२५ (भाग) भुलेश्वर विभाग- उपकर क्र.सी-४४९५,सी-५१९६,सी-५२०६ व ५२०७ आणि सी-५२१० (१-२)इ.क्र.२-१६,१३१-१४५, १५५बी आणि १५५सी ,भुलेश्वर रोड, मुंबई येथील राम मंदिर चाळ व समुद्री माता मंदिर चाळ म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रस्तावात बदल करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी सदर प्रस्तावातील मालत्तेस सदस्यांनी भेट दिल्या शिवाय सदर प्रस्ताव मंजूर करता येणार नाही, असे सांगितले व त्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली.

**ठराव क्रमांक - ११८८**

भूकर पहाणी क्र.२३२४ (भाग) व २३२५ (भाग) भुलेश्वर विभाग- उपकर क्र.सी-४४९५, सी-५१९६,सी-५२०६ व ५२०७ आणि सी-५२१० (१- २)इ.क्र.२-१६,१३१-१४५,१५५बी आणि १५५सी ,भुलेश्वर रोड, मुंबई येथील राम मंदिर चाळ व समुद्री माता मंदिर चाळ म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास सन्मा.सदस्यांनी भेट दिल्यानंतर मंजुरी देण्याचे ठरले.

त्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली.

तरी सदर प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**बाब क्रमांक. १३७.७ (१)**

**पुनर्विकास -** मुंबई बेटावरील अ-वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

**१.**भूकर पहाणी क्र.९०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.९१, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.२ व ७०, सर भालचंद्र रोड, दादर (पूर्व), मुंबई १४ येथील '**कृष्णभवन** '.

**२.**भूकर पहाणी क्र.३०८ माझगांव विभाग, इ.क्र.४,म्हातारपाखाडी क्रॉस लेन,मुंबई १० येथील '**मेमन व्हिला**'.

**३.**अंतिम भूखंड क्र.४८२, टीएस-४,माहिम विभाग, इ.क्र.२९,२९-अे, ३१-३१अे, ३३-३३अे,३५-३५अे,३७-३७अे, ३७बी, २१जी, २७बी,२१ई, १९-१९अे,७२९ई, ३७ व ३७ जी, भवानी शंकर रोड, दादर, (पश्चिम) मुंबई २८ येथील '**पाध्येवाडी**'.

**४.**भूकर पहाणी क्र.१६६४ भायखळा विभाग, इ.क्र.४१ मोरलँड रोड,मुंबई येथील '**मेहफिल कम्युनिटी हॉल**'.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८३ ते ९९ वर मंजुरीस्तव सादर करण्यांत आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११८९**

मुंबई बेटावरील खालील ४ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**१.**भूकर पहाणी क्र.९०/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.९१, दादर- माटुंगा इस्टेट, इमारत क्र.२ व ७० , सर भालचंद्र रोड, दादर (पूर्व), मुंबई १४ येथील '**कृष्णभवन** '.

**२.**भूकर पहाणी क्र.३०८ माझगांव विभाग, इ.क्र.४,म्हातारपाखाडी क्रॉस लेन,मुंबई १० येथील '**मेमन व्हिला**'.

**३.**अंतिम भूखंड क्र.४८२, टीएस-४,माहिम विभाग, इ.क्र.२९,२९-अे, ३१-३१अे, ३३-३३अे,३५-३५अे,३७-३७अे, ३७बी, २१जी, २७बी,२१ई, १९-१९अे,७२९ई, ३७ व ३७ जी, भवानी शंकर रोड, दादर, (पश्चिम) मुंबई २८ येथील '**पाध्येवाडी**'.

**४.**भूकर पहाणी क्र.१६६४ भायखळा विभाग, इ.क्र.४१ मोरलँड रोड,मुंबई येथील '**मेहफिल कम्युनिटी हॉल**'.

सचिव श्री.महिषी यांनी सभागृहास मूळ विषयसूचीतील विषय संपले असून, मा.अध्यक्षांची परवानगी असल्यास , आयत्या वेळचे विषय चर्चेस घेता येतील, असे सांगितले. मा.अध्यक्ष यांनी आयत्या वेळचे विषय घेण्यास परवानगी दिली.

## आयत्यावेळचे विषय

**बाब क्रमांक.१३७.२(६)**

**विषय:-**उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.
परिमंडळ-१ मधील (अे,सी-१,सी-२ व सी-३) **२४** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१११ ते १२५ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-**अ** व परिशिष्ट-**ब** मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **२४** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,०२,२४,११३ /- (रुपये तीन कोटी दोन लक्ष,चोवीस हजार एकशे तेरा फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,५७,८०,६२९ /- (रुपये एक कोटी सत्तावन्न लक्ष ऐंशी हजार सहाशे एकोणतीस फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.२(७)**

**विषयः-**उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.
परिमंडळ-३ मधील (बी,ई-१,व ई-२) **३२** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१२७ ते १३९ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-**अ** मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **३२** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,९९,७८,३१७ /- (रुपये चार कोटी नव्व्याण्णव लक्ष,अठ्ठयाहत्तर हजार तिनशे सतरा फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,१५,७८,६८६ /- (रुपये तीन कोटी पंधरा लक्ष अठ्ठयाहत्तर हजार सहाशे शहाऐंशी फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.२(८)**

**विषयः-**उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.
परिमंडळ-१ मधील (अे,सी-१,सी-२ व सी-३) **३२** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१४१ ते १५५ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-**अ** व परिशिष्ट-**ब** मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **३२** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,३३,६३,९९२ /- (रुपये पाच कोटी तेहतीस लक्ष,त्रेसष्ट हजार नऊशे ब्याण्णव फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,०२,८१,३८० /- (रुपये तीन कोटी दोन लक्ष एक्याऐंशी हजार तिनशे ऐंशी फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.२(९)**

**विषय:-**उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.
परिमंडळ-३ मधील (बी,ई-१ व ई-२) **०९** इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१५७ ते १६५ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकांना परिशिष्ट-**अ** मध्ये नमूद केल्यानुसार एकूण **०९** उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामांसाठी एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रु.९१,६३,५११ /- (रुपये एक्याण्णव लक्ष त्रेसष्ट हजार पाचशे अकरा फक्त ) व निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६३,७९,६२५ /- (रुपये त्रेसष्ट लक्ष एकोणऐंशी हजार सहाशे पंचवीस फक्त) इतक्या रकमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.४(४)**

**विषय:-परिमंडळ-२ व ३** मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रकमेस मंजुरी मिळण्याबाबत.
इ.क्र.१४-१६ खरास बिल्डींग, एन.एम.जोशी मार्ग, परिमंडळ-२

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१६७ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९४**

इ.क्र.१४-१६ खरास बिल्डींग, एन.एम.जोशी मार्ग या इमारतीच्या पाचव्या टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या नकाशे व अंदाजपत्रकास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवरील वाढीव रक्कम रुपये १,८२,५७९/- या रकमेस प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.४(५)**

**विषय:-परिमंडळ-२ व ३** मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रकमेस मंजुरी मिळण्याबाबत.
इ.क्र.३५-३७,डी.डी.साठे मार्ग, परिमंडळ-३

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१६९ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९५**

इ.क्र.३५-३७, डी.डी.साठे मार्ग या इमारतीच्या सहाव्या टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवरील वाढीव रक्कम रुपये ४,२१,५१२/- या रकमेस प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.४(६)**

**विषय:-परिमंडळ-२ व ३** मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रकमेस मंजुरी मिळण्याबाबत.
इ.क्र.८६-८८,संत सेना महाराज मार्ग, परिमंडळ-२

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१७१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९६**

इ.क्र.८६-८८, संत सेना महाराज मार्ग,परिमंडळ-२ या इमारतीच्या तिस-या टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्ती कामासाठी नकाशे व अंदाजपत्रकास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवरील वाढीव रक्कम रुपये ४४,६३४/- या रकमेस प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक.१३७.४(७)**

**विषय:-परिमंडळ-२ व ३** मधील दुरुस्ती कामाला प्रशासकीय मान्यतेवरील रकमेस मंजुरी मिळण्याबाबत.
इ.क्र.७-ई, इचपाल बिल्डींग, बाल गोविंददास रोड, माहिम, परिमंडळ-२

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१७३ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - ११९७**

इ.क्र.६-ई, इचपाल बिल्डींग, बाल गोविंददास रोड, माहिम,परिमंडळ-२ या इमारतीच्या चौथ्या टप्प्यातील संरचनात्मक दुरुस्तीच्या सुधारित नकाशे व अंदाजपत्रकास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेवरील

वाढीव रक्कम रुपये १,८७,४२८/- या रकमेस प्रशासकीय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक. १३७.५ (३)**

**विषय:-** इमारत क्र.१०-१०बी, तारा टेंपल लेन.( **शुध्दीपत्रक**)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१७५ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११९८**

इमारत क्र.१०-१०बी, तारा टेंपल लेन, प्रमाणित मर्यादेवरील रक्कम शुन्य ऐवजी ती रु.४०१८०/- अशी दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक. १३७.५ (४)**

**विषय:-** इमारत क्र.८०-एफ, आर.एस.निमकर रोड.( **शुध्दीपत्रक**)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१७७ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -११९९**

इमारत क्र.८०-एफ, आर.एस.निमकर रोड, दुरुस्तीचा दर रु.११८९.६४ च्या ऐवजी रु.२०४९.८५/- अशी दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक. १३७.५ (५)**

**विषय:-** डी-१ विभागातील इमारती.( **शुध्दीपत्रक**)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१७९ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१२००**

**इ.क्र.२५ व २७** ही एक इमारत व इमारत क्र.२१-२१(ए) व इ.क्र.२३-२३(बी) अशा एकूण तीन स्वतंत्र इमारती करण्याकरिता तसेच दि.२८ मे २००९ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत देण्यांत आलेल्या प्रशासकीय मंजुरीस त्या इमारतीच्या बांधकामाच्या क्षेत्रफळानुसार प्रशासकीय मंजुरी विभागून देण्यास

सर्वानुमते मान्यता देण्यांत आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक. १३७.५ (६)**

**विषय:-** इमारत क्र.१८६-२१९ इब्राहिम मोहमद मर्चंट रोड (**शुध्दीपत्रक**)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१८१ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक -१२०१**

इमारत क्र.१८६-२१० इब्राहिम रहिमतुल्ला रोड या नावाऐवजी १८६-२१० इब्राहिम मोहमद मर्चंट रोड अशी दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक - १३७.७ (५)**

**पुनर्विकास**

**विषय:-**मुंबई बेटावरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.
भूकर पहाणी क्र.१७१४ भायखळा विभाग, इ.क्र.१४, सिध्दिकी लेन, मोहंमद उमर रज्जब रोड, मदनपुरा, मुंबई येथील '**जुनैद मंजिल**'.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १८३ ते १८५ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सदर प्रस्ताव हा ना हरकत प्रमाणपत्रास मंजुरी देण्याचा प्रस्ताव असल्याने आयत्या वेळच्या विषयामध्ये घेण्यांत येऊ नये, तरी सदर प्रस्ताव पुढील बैठकीत मंडळासमोर सादर करावा. असे बहुतांश सदस्यांनी सांगितले. सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी त्यास विरोध दर्शविला. मात्र बहुमताने सदर प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्याचे ठरले.

**बाब क्रमांक. १३७.८**

**विषय:-**विशेष निधी अंतर्गत माजी आमदार श्री.दत्ताजी नलावडे यांच्या तत्कालीन वरळी मतदार संघात मंजूर झालेल्या कामामध्ये, प्रस्तावित बदलास मान्यता देणेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १८७ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक. १२०२**

विशेष निधी अंतर्गत मंजूर केलेले

| | |
|---|---|
| १) १४४ वरळी कोळीवाडा येथील इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती करणे | रु.१.०० लक्ष |
| २) १२४ वरळी कोळीवाडा येथील इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती करणे | रु.२.०० लक्ष |

रु.३.०० लक्ष

वरील दोन कामांऐवजी इ.क्र. १०३ वरळी कोळीवाडा या इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीचे काम अंदाजपत्रकीय रक्कम रु.३.०० लक्ष हे करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

**बाब क्रमांक - १३७.९**

**विषय:-**इ.क्र.२०, मंगलवाडी, जगन्नाथ शंकर शेठ, मार्ग, गिरगांव, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.१८९ ते १९३ वर मंजुरीसाठी सादर करण्यांत आला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी इ.क्र.२०,मंगलवाडी येथे खिडक्यांना ग्रेनाईट फ्रेम बसवण्यासाठी येणारा खर्च रु.१,०६,१७३/- जरी भाडेकरु/रहिवाशी मंडळाकडे भरण्यास तयार असतील तरी तो तसा पायंडा पडेल व असा खर्च भाडेकरु/रहिवाश्यांकडून वसूल न करता मंडळाने सदर खर्च सहन करावा, असे सांगितले, त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सदर प्रकरणी प्राधिकरणाची मान्यता घेताना सदर खर्च भाडेकरु/रहिवाशी मंडळाकडे भरण्यास तयार असल्याचे दर्शवून मान्यता घेण्यांत आल्याचे सांगितले. जर सदर खर्च मंडळास सहन करावयाचा असेल तर पुन्हा सुधारित टिप्पणी प्राधिकरणापुढे नेऊन, मान्यता घ्यावी लागेल. त्यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळ एकेका योजनेसाठी करोडो रुपये खर्च करते व शुल्लक रक्कम रुपये १,०६,१७३/- ही भाडेकरुंकडून वसूल करणे योग्य नाही. त्यास सर्व सन्मा.सदस्यांनी सहमती दर्शविली. खिडक्यांना ग्रेनाईट फ्रेम बसवण्यासाठी येणारा खर्च रु.१,०६,१७३/- भाडेकरुंकडून वसूल न करता, मंडळातर्फे करण्याबाबत शिफारस करुन, प्राधिकरणाची मान्यता घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक. १२०३**

इ.क्र.२०, मंगलवाडी, जगन्नाथ शंकर शेठ, मार्ग, गिरगांव, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव हा खिडक्यांसाठी ग्रेनाईट फ्रेम बसवण्याकरिता येणारा खर्च रु.१,०६,१७३/- भाडेकरुंकडून वसूल न करता, मंडळातर्फे करण्याबाबत शिफारस करुन सदर योजनेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये १,०५,७८,१३४/- इतक्या रकमेस सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी दिली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बाबतीत बातमी आली होती की, ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या इमारतीतील गाळे तसेच पडून आहेत, त्याचे वितरण होत नाही, असा त्यांचा मुद्दा खास करुन होता. आता कांही अंशी तरी ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या इमारतीतील गाळे मास्टर लिस्ट मध्ये घेण्यांत यावे. यावर मुख्य अधिकारी/दुवपु यांनी

सांगितले की, या एप्रिलमध्ये आपण जाहिरात देत आहोत, आपण सर्व्हे करत आहोत, आपल्याकडे २६८ गाळयांची जी यादी आहे, ती आपण एप्रिल मध्ये प्रसिध्द करीत आहोत.

सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून सचिव श्री.महिषी यांनी बैठक संपल्याचे जाहिर केले.

निवासी कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

मा.मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ